# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः04.06.2025** **वारःबुधवार**

---

1. मणिपूरमधील पूरस्थितीचा पंतप्रधानांकडून आढावा, केंद्राकडून सर्वतोपरी मदतीची ग्वाही
2. सिक्कीममध्ये अडकून पडलेल्या पर्यटकांच्या सुटकेत वाईट हवामानामुळे अडथळे, सर्व पर्यटक हॉटेलमध्ये सुरक्षित असल्याची प्रशासनाची माहिती
3. कीडरोगमुक्त रोपं निर्मितीसाठीच्या 'क्लिन प्लांट' कार्यक्रमांतर्गत देशातील नऊपैकी तीन केंद्रं महाराष्ट्रात उभारणार असल्याची केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांची घोषणा आणि
4. आयपीएल स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला विजेतेपद

**<u>पंतप्रधान-मणिपूर पूर परिस्थिती</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल मणिपूरचे राज्यपाल अजय कुमार भल्ला यांच्याशी संवाद साधून राज्यातील पूर परिस्थितीचा आढावा घेतला. मणिपूरमधील पूर परिस्थितीचा सामना करण्यासाठी केंद्राकडून सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासनही त्यांनी दिलं. मणिपूरमध्ये इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील 643 गावं पुरामुळं बाधित झाली असून, एक लाख 64 हजार 800 हून अधिक लोक विस्थापित झाले आहेत. आतापर्यंत या नैसर्गिक आपत्तीत एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे आणि चार जण जखमी झाले आहेत. पुरात 35 हजारहून अधिक घरांचं नुकसान झालं आहे. सरकार आणि स्वयंसेवी संस्थांनी 81 मदत छावण्या उभारल्या आहेत. राज्यात सततच्या पावसामुळं 102 भूस्खलनाच्या घटना घडल्या आहेत आणि राज्यातील रस्ते संपर्क विस्कळीत झाला आहे. राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती निवारण दल, पोलिस, निमलष्करी दल, रेडक्रॉस, अग्निशमन दलांकडून पूरग्रस्त भागात बचावकार्य सुरू आहे.

दरम्यान, मणिपूरमध्ये हवामान सुधारलं असून पावसाचा जोर कमी झाला आहे. बहुतांश नद्यांच्या पाण्याची पातळी कमी झाली आहे.

दरम्यान, केंद्रीय गृह सचिव गोविंद मोहन यांनी आपल्या दोन दिवसांच्या मणिपूर दौऱ्यात विविध ठिकाणच्या मदत छावण्यांना भेट दिली आणि विस्थापित व्यक्तींच्या तक्रारी ऐकल्या. त्यांनी स्थलांतरितांना त्यांच्या गरजा संबंधित उपायुक्तांकडे त्वरित आणि आवश्यक कारवाईसाठी सादर करण्याचा सल्ला दिला. त्यानंतर, त्यांनी राज्यपालांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीत भाग घेतला आणि स्थलांतरितांचे पुनर्वसन, भारत-म्यानमा सीमेवरील कुंपण आणि राज्याच्या कायदा आणि सुव्यवस्थेच्या परिस्थितीवर चर्चा केली.

**<u>सिक्कीम</u>**

सिक्कीममध्ये लाचेन आणि चाटेन इथं अनेक ठिकाणी भूस्खलन झाल्यामुळं रस्ते संपर्क तुटल्यानं, अडकून पडलेल्या 150 पर्यटकांपैकी 34 जणांची काल सुटका करण्यात आली. उर्वरित पर्यटकांच्या सुटकेसाठी वायु दल आणि आपत्ती निवारण दलानं आज सकाळपासून पुन्हा प्रयत्न सुरू केले आहेत, मात्र वाईट हवामानामुळं बचाव कार्याला सुरुवात झालेली नाही. वायु दलाला हेलिकॉप्टर उतरवण्यात अडथळे येत आहेत. चाटेन इथं 130 पर्यटक असून ते त्यांच्या हॉटेलमध्ये सुरक्षित आहेत.

एनडीआरएफच्या सॅटेलाईट फोनद्वारे त्यांच्याशी संपर्क साधण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हा अधिकारी अनंत जैन यांनी दिली आहे. यात महाराष्ट्रातल्या काही पर्यटकांचा समावेश असून त्यांच्या सुटकेसाठी राज्य सरकारनं स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधला आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल सिक्कीमचे मुख्यमंत्री प्रेमसिंह तमांग यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधून मदतकार्याचा आढावा घेतला, तर सिक्कीमचे राज्यपाल ओम प्रकाश माथूर यांनी सिंगथाम इथं भेट देऊन मदतकार्याचा आढावा घेतला.

**<u>राष्ट्रपती</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी लडाखच्या लडाख स्वायत्त हिल काउन्सिलच्या नियमातील सुधारणांचे अधिसूचना जारी केली आहे. या बदलामुळे 1997 च्या कायद्यात सुधारणा करून एकंदर जागांपैकी एक तृतीयांश जागा महिलांसाठी राखीव ठेवता येतील. या सुधारणेअंतर्गत, राजपत्रित अधिसूचनेद्वारे प्रत्येक वेगवेगळ्या प्रादेशिक मतदारसंघाला या जागा अनुक्रमांकानुसार वाटल्या जातील. लडाख स्वायत्त हिल काउन्सिल ही एक वैधानिक संस्था असून, यात तीस सदस्य लेह आणि कारगिल जिल्ह्यातील कामकाज सांभाळतात.

**<u>योग दिन-आंध्र प्रदेश</u>**

आगामी आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर, सर्वत्र योगविषयी दाखवण्यात येणारा उत्साह आणि योगआंध्र 2025 च्या यशस्वितेसाठी आंध्र प्रदेशातील सर्वसामान्य नागरिक घेत असलेले कष्ट पाहून आनंद वाटत आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. या ऐतिहासिक कार्यक्रमाबाबत आपल्याला उत्सुकता असून, नागरिकांनी योगाचा आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग करण्याची आवश्यकता आहे, असं त्यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>शिवराज सिंह चौहान-पुणे</u>**

कीडरोग मुक्त रोपं निर्मितीसाठीच्या 'क्लिन प्लांट' कार्यक्रमांतर्गत देशातील नऊपैकी तीन केंद्रं महाराष्ट्रात उभारणार असल्याची घोषणा केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी काल पुण्यात केली. विकसित कृषी संकल्प अभियानाअंतर्गत कृषी हॅकेथॉनच्या समारोप समारंभात ते बोलत होते. द्राक्षं केंद्र पुणे इथं, संत्र्यासाठी नागपूर आणि डाळींबासाठी सोलापूर इथं केंद्र सुरू करण्यात येणार असून या केंद्रांच्या आधारे राज्याचं फलोत्पादन क्षेत्र जगात आघाडी घेईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शेती क्षेत्रासमोर अनेक समस्या असताना शेतकऱ्याला साहाय्य करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर हा एकमात्र उपाय आहे. हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणं गरजेचं असून त्यासाठी कृषी विभागानं पुढाकार घेऊन कृषी महाविद्यालयांमध्ये इन्क्युबेशन केंद्रं तयार करावीत, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केलं. दरम्यान, प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत ग्रामीण लाभार्थी मेळाव्यात शिवराजसिंह चौहान आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत महाआवास राज्यस्तरीय पुरस्कारांचं वितरण झालं, तसंच काही लाभार्थ्यांना त्यांच्या घरांच्या प्रतीकात्मक चाव्या प्रदान करण्यात आल्या. महाराष्ट्रातल्या 30 लाख बेघर जनतेला प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरे मिळवून देणारं महाराष्ट्र हे पहिलं राज्य असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

**<u>भारत शिष्टमंडळं</u>**

दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी जगातल्या विविध देशांना भेट देण्यासाठी रवाना झालेली बहुपक्षीय शिष्टमंडळं मायदेशी परतत आहेत. अल्जेरिया, सौदी अरेबिया, कुवेत आणि बहरीन या देशांना भेट देऊन परतलेल्या भाजपा खासदार बैजयंत पांडा यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं काल नवी दिल्ली इथं परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर यांची भेट घेतली आणि आपल्या प्रतिक्रिया आणि सूचना सादर केल्या. या उपक्रमातून सरकारची सर्व उद्दिष्टं साध्य झाल्याचं जयशंकर म्हणाले आणि त्यांनी या शिष्टमंडळाचं अभिनंदन केलं, अशी माहिती शिष्टमंडळाचे सदस्य, तसंच राजनैतिक अधिकारी हर्षवर्धन श्रृंगला यांनी दिली.

द्रमुक खासदार कनिमोळी करुणानिधी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळही रशिया, लाटविया, स्लोव्हेनिया, ग्रीस आणि स्पेनचा दौरा करून परत आलं असून, त्यांनाही चांगला प्रतिसाद मिळाला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालील बहुपक्षीय शिष्टमंडळाने काल इजिप्तचे परराष्ट्र मंत्री डॉ. बद्र अब्देलट्टी यांची भेट घेतली. परराष्ट्र मंत्री अब्देलट्टी यांनी दहशतवादाविरुद्धच्या भारताच्या लढाईला इजिप्तचा पाठिंबा असल्याचं स्पष्ट केलं. शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळानं लायबेरियाच्या दौऱ्यात सर्व प्रकारच्या दहशतवादाविरुद्धच्या लढाईत द्विपक्षीय सहकार्य बळकट केलं. जनता दल संयुक्त पक्षाचे खासदार संजय कुमार झा यांच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय संसदीय शिष्टमंडळानं क्वालालंपूर इथं आग्नेय आशिया प्रादेशिक दहशतवादविरोधी केंद्राचे महासंचालक दातिन तैब यांची भेट घेऊन भारताची सर्व प्रकारच्या दहशतवादाविरोधातील दृढ आणि तत्वनिष्ठ भूमिका स्पष्ट केली.

**ब्रिटन-मिस्त्री**

दहशतवादाविरुद्धच्या लढाईत ब्रिटन सरकारनं भारताला दिलेल्या पाठिंब्याबद्दल भारतानं प्रशंसा केली आहे. भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी काल नवी दिल्लीत ब्रिटनचे परराष्ट्र स्थायी उप-सचिव ऑलिव्हर रॉबिन्स यांची भेट घेतली आणि व्यापार, गुंतवणूक आणि वित्तीय क्षेत्र, संरक्षण आणि सुरक्षा, दहशतवादविरोधी, तंत्रज्ञान यासह इतर क्षेत्रात सहकार्य बळकट करण्याबाबत चर्चा केली.

**दक्षिण कोरिया**

दक्षिण कोरियात झालेल्या निवडणुकीत लिबरल पक्षाचे नेते ली जे-म्युंग विजयी झाले असून, ते नवे राष्ट्रपती होणार आहेत. त्यांनी त्यांचे मुख्य प्रतिस्पर्धी, सत्ताधारी पीपल पॉवर पार्टीचे नेते किम मून-सू यांचा पराभव केला. मून यांनी जनतेच्या निर्णयाचे नम्रपणे स्वीकार करत असल्याचे सांगत, ली यांचे अभिनंदन केले. मून यांनी सहा महिन्यांपूर्वी देशात मार्शल लॉ घोषित केला होता. त्यानंतर ही निवडणूक झाली असून, आता देशात राजकीय स्थिरतेमुळे अशांतता दूर होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघानं विजेतेपद पटकावलं आहे. काल अहमदाबाद इथं झालेल्या चुरशीच्या लढतीत रॉयल चॅलेंजर्सनं बंगळुरू संघानं किंग्ज इलेव्हन पंजाबचा सहा धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना रॉयल चॅलेंजर्सनं 190 धावा केल्या तर प्रत्युत्तरादाखल किंग्ज इलेव्हन पंजाबनं 184 धावा केल्या. बंगळुरूच्या कृणाल पांड्याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आलं.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार